# मंगलाताई भागवत फाऊंडेशन

**वेळ : ३ तास** **विषय : कुमारभारती** **गुण : ८०**

**सूचना :**

१. दिलेल्या सूचनांनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

२. आकृत्या पेनानेच काढाव्यात.

३. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृत्या काढाव्याची आवश्यकता नाही. कृती सुद्धा लिहून घेऊ नयेत.

४. विभाग–५ उपयोजित लेखन प्र.५(अ) '२ सारांशलेखन' या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१(इ) अपरित उतारा वाचून त्या उताऱ्याचा $\frac{1}{3}$ सारांश लिहावयाचा आहे.

५. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ : गद्य

**पठित गद्य – प्रश्न १अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

(१) आकृती पूर्ण करा – रुपकथेची वैशिष्ट्ये.

१. [ ] २. [ ] ३. [ ] ४. [ ]

बालपणापासून आपणाला कथा खूप आवडतात. विज्ञान कथा, ऐतिहासिक कथा, रहस्य कथा असे कथेचे अनेक प्रकार आहेत. यापैकी एक प्रकार म्हणजे रुपक कथा होय.

रुपक कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ती आकाराने लहान असते. तिच्यात अर्थघनत्व, आशय समृद्धता आणि सूचकता असल्याने ती अधिक परिणामकारक होते. नाट्यात्मकता, आलंकरिकता आणि संदेशपरता ही रुपक कथेची आणखी काही वैशिष्ट्ये होत. रुपक कथेतून वाच्यार्थ क्षणोक्षणी अंशत: कमी होत जाऊन लक्ष्यार्थ प्रभावीपणे सूचित होतो. खालील कथा वाचून आपल्याला त्याचा अनुभव येईलच.

हिवाळा नुकताच सुरु झालेला होता.

झाडावरुन एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली.

पट... पट... पट...

त्यांचा तो पट... पट... असा कर्णकटू आवाज...

तो आवाज ऐकून धरणी मातीच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले,

’पडता पडता किती कटकट करतोयस तू ? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड–गोड स्वप्नांचा चुराडा झाला की !’

पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, अरे जा ! चिडखोर बिब्बा कुठला ! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या वा उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार ? हा दंगा नाही, बेटा ! हे गाणं चाललंय ! जन्मात कधी आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजायचं नाही !’ हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.

ते पुन्हा जागे झाले. ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने ! त्या स्पर्शात विलक्षण जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरणीमातेच्या कुशीत लपू लागले–झोपू लागले. पण पुन्हा:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती... पट पट असा आवाज करीत पृथ्वीवर पडत होती.

ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, ’काय ही हिवाळ्यातली पानं ! जीव खाऊन टाकला यांनी अगदी ! केवढा हा कर्णकटू आवाज... छी... छी...छी... ! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी !’

**२. कारणे लिहा.** **(२)**

१) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्याने गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली, कारण........

२) ’अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही’ असे गळून पडणारे पान म्हणाले, कारण ?

**(३)**

३) स्वमत–गवताच्या पात्याच्या ठिकाणी तुम्ही असता, तर पानाला तुम्ही काय उत्तर दिले असते ?

**आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

स्वातंत्र्यसमराच्या ऐन धुमाळीच्या काळात, म्हणजे १८ एप्रिल १९५८ रोजी महर्षी कर्वे यांचा जन्म झाला. नंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी राष्ट्रीय स्वातंत्रही त्यांच्या डोळ्यांदेखत कमावले गेले, पण स्वातंत्र केवळ राष्ट्रीय मिळून भागत नाही स्वातंत्र्य संपूर्णच हवे असते, हे त्यांना आधीपासून जाणवत होते. या देशातील स्त्री गुलाम आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य कमावल्यावरसुद्धा ती गुलामच राहील, हे त्यांना दिसत होते. तिला स्वतंत्र व्हायचे असेल तर तिला भान यावयास हवे, की आपण गुलाम आहोत आणि हे भान शिक्षणाशिवाय येऊ शकत नाही. मात्र, खुद्द भारतीय स्त्रीवर संस्कारच असे होते, की ती आपल्या गुलामीला दागिना मानीत असे ! आपल्या समाजात स्त्रीचे स्थान देवीचे आहे, असे भासवले जात असेलही; पण, तिला शूद्रतिशूद्र समजून तिचा प्रच्छन्न छळच केला जाई. सबब, तिने शिक्षित व्हायलाच पाहिजे, हे कार्व्यांना ठामपणे वाटत होते !

तथापि, हे कार्य अतोनात कठीण आहे, हेही त्यांना दिसत होते. स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे, असे वाटणे म्हणजे खडकावर डोके आपटण्यासारखे होते. शांत सोशिकपणे, सहिष्णू वृत्तीने राहिलो तर ते असिधराव्रत परिपूर्ण होऊ शकेल, याची त्यांनी खूणगाठ बांधली. सावकाश तरी हमखास हे कार्य करणे गजरेचे होते ! नुसत्या अडीअडचणी येतील असे नव्हते. संपूर्ण समाजा विरुद्ध विद्रोह करावा लागणार होता. असे केले, तर समाज आपल्याला गिळून टाकायला येईल, हे कळत होते.

पंडिता रमाबाई यांचे जीवन चरित्र आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे जीवनकार्य यांतून महर्षी कर्वे यांना हुरुप मिळाला.

**१) पुढील विधाने पूर्ण करा.** **(२)**

i) स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे, म्हणजे .....................

ii) समाजाविरुद्ध विद्रोह केला, तर .....................

**२) आकृती पूर्ण करा.** **(२)**

i) महर्षी कर्वे यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य प्रकार → [ ] → [ ]

ii) महर्षी कर्वे यांची प्रेरणा स्थाने → [ ] → [ ]

४) 'स्वमत' जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' हे वचन महर्षी कर्वे यांच्या जीवनाला कसे लागू पडते, ते स्पष्ट करा. **(३)**

**अपठित गद्य**

**इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.** **(२)**

i) उत्तरे लिहा. i) आनंदी होण्याचा उपाय लिहा.


ii) जीवनात चालू असलेल्या प्रत्येकाचा प्रयत्न लिहा.

जीवनात प्रत्येकाचा प्रयत्न आनंदी होण्यासाठी चाल असतो. अनेक प्रकारच्या संकटांनी ग्रस्त व त्रस्त झालेली माणसे दु:खी असावीत, याचा आश्चर्य ते काय ? पण जीवनातील सर्व सुविधांची सुबत्ता ज्यांच्याजवळ आहे, अशी सधन माणसेही दु:खाचीच कहाणी सांगतात. अनेक बाह्य कारणांनी स्वत:ला माणसे दु:खी बनवीत असतात. विवेकानंदांच्या मते, अहंकाररहितता व स्वार्थनिरपेक्षता याशिवाय आनंदप्राप्ती होणार नाही.

मनुष्य मूर्खपणाने व स्वार्थाने स्वत:लाच केवळ आनंदी बनवण्याचा विचार करतो. त्यासाठी वर्षानुवर्षे पराकाष्ठा करतो; पण खरा आनंद स्वार्थाला मारण्याने मिळणार आहे. आनंदी होण्यासाठी इतरत्र धावण्याची गरज नाही. स्वार्थी वृत्ती अशी आहे की, स्वार्थामध्ये बाधा आल्यास ती दु:खी बनवते. त्यामुळे ती स्वार्थी वृत्तीच त्यागावी. हा आनंदी होण्याचा उपाय ठरेल, असे ते म्हणतात.

२)  **आकृतीबंध पूर्ण करा.** **(२)**

विवेकानंदांच्या मते, आनंदी होण्यासाठी आवश्यक दोन गोष्टी




**विभाग – २ पद्य**

**प्रश्न २.अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.(फक्त २)** **(२)**

१) आकृती पूर्ण करा.

मन वाईट गोष्टींकडे वळू नये म्हणून करावयाच्या गोष्टी



सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो ; विषय सर्वथा नावडो;
संदंध्रिकमळी दडो ; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतं रडो ; मन भवच्चरित्रीं जडो ।।
न निश्चय कधीं कळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो ; मति सदुक्तमार्गी वळो; ।
स्वतत्व हृदया कळो ; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो ; दुरित आत्मबोधें जळो ।।
मुखीं हरि ! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली ;
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजश्रितजनां सदा सांवरी ।।

**२) पुढील गोष्टींच्या बाबतीत व कवी परमेश्वराजवळ कोणती विनंती करतात, ते लिहा.** **(२)**

| | **गोष्टी** | | **विनंती** |
|---|---|---|---|
| i) | निश्चय | – | ............................ |
| ii) | चित्त | – | ............................ |
| iii) | दुराभिमान | – | ............................ |
| iv) | मन | – | ............................ |

**३) पुढील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.** **(२)**

स्वतत्व हृदया .................. आत्मबोधे जळो !!

**४) काव्य सौंदर्य** **(२)**

वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल, ते लिहा.

**आ) पुढील मुद्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा.**

| **मुद्दे** | **आश्वासक** | **चित्र किंवा खोद आणखी थोडेसे** | |
|---|---|---|---|
| i) प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री – | ....... | ....... | **(१)** |
| ii) प्रस्तुत कवितेच विषय – | ....... | ....... | **(१)** |
| iii) प्रस्तुत कवितेतून व्यक्त होणारे विचार | ....... | ....... | **(१)** |

**इ) रसग्रहण :** **(४)**

पुढे दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.

'तुझे शब्द असे की महाकाव्ये तुझ्या पायाजवळ गळून पडावीत.
तुझा संघर्ष असा की काठ्यांच्या सांगिनी न्हाव्यात.'

## विभाग – ३ स्थूलवाचन

**प्रश्न ३. पुढीलपैकी कोणत्याही २ कृती सोडवा.** **(६)**

i) टीप लिहा – मुले भटकण्याची कारणे.

ii) 'पति निधनानंतर आपण सैन्यात भरती व्हायचं' स्वाती महाडिक यांच्या या निर्धारातून समाजाला काय संदेश मिळतो ते तुमच्या शब्दांत लिहा.

३) साहित्यकृतींचा आस्वाद घेताना लक्षात घ्यायचे मुद्दे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## विभाग – ४ भाषाभ्यास

**प्रश्न ४.अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती:**

i) समास :

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा. **(२)**

| **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|
| i) कमलनयन | ......... | ......... |
| ii) बरेवाईट | ......... | ......... |

२) **शब्दसिद्धी :** **(१)**

१) पुढील शब्दांना 'इक' हा प्रत्यय लावून शब्द तयार करा.

i) समाज ii) शरीर

२) **'अडीअडचणी ' सारखे दोन अभ्यस्त शब्द लिहा.** **(१)**

i) समाज ii) शरीर

३) **वाक्प्रचार:** **(४)**

**पुढीलपैकी कोणत्याही २ वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) ससेहोलपट होणे ii) मुहुर्तमेढ रोवणे iii) खूणगाठ बांधणे

iv) वस्तुपाठ घालून देणे

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**शब्दसंपत्ती :**

**१) पुढील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.** **(१)**

i) चांगल्या प्रकारे शिक्षित असलेला – [ ]

ii) लिहिता–वाचता येणारा – [ ]

**२) पुढील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

i) जमा x [ ] ii) अनाथ x [ ]

**३) पुढील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

i) गोड = [ ] ii) पृथ्वी = [ ]

**४) पुढील शब्दांचे वचन ओळखा.** **(१)**

i) पाते - [ ] ii) पुस्तक - [ ]

**२) लेखन नियमांनुसार लेखन.** **(२)**

**अ) पुढील वाक्ये लेखन नियमांनुसार अचूक लिहा.**

i) मानवी जीवनातले कितीतरी विसंवाद प्रतीबिंबीत झाले आहेत.

ii) दुरवर जंगलातून येणारा एक लाकुडतोड्या दिसला.

**३) विरामचिन्हे** **(१)**

**पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

आपण आपल्या आईशी, बहिणीशी, बायकोशी, कन्येशी पुष्कळदा चुकीचे वागतो.

४) परिभाषिक शब्द: (१)

**पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.**

i) Lift = ☐ ii) Absence = ☐

## विभाग – ५ उपयोजित लेखन

**प्रश्न ५.अ) पुढील कृती सोडवा.** **(६)**

i) पत्रलेखन :

**पुढील पोस्टर वाचा व दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

आनंदवनभुवनी

**शारदा विद्यालय**

बोरिवली

सहर्ष साजरा करीत आहे

**वनमहोत्सव**

१ जुलै ते ३१ जुलै

आनंदवनभुवनी

रसिक/रजनी जाधव हा/ही शारदा विद्यालय, बोरिवली या शाळेचा/ची **विद्यार्थी प्रतिनिधी** वन–अधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांना वनमहोत्सवात वृक्षारोपण करण्यासाठी रोपे पुरवण्याची मागणी करणारे पत्र लिहित आहेत. ते मागणीपत्र तयार करा.

**किंवा**

रसिक/रजनी जाधव हा/ही शारदा विद्यालय, बोरिवली या शाळेचा/ची **विद्यार्थी प्रतिनिधी** मुंबई महानगर पालिकेच्या बोरिवली विभागाचे विभाग अधिकारी यांना बोरिवली रेल्वे स्टेशन ते आपली शाळा या रस्त्यावर दुतर्फा वृक्षारोपण करण्यास परवानगी मागणारे पत्र लिहित आहेत. ते विनंतीपत्र तयार करा.

**किंवा**

**२) सारांशलेखन:**

विभाग १: गद्य (इ) प्रश्न क्र. १ (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक–तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**प्रश्न ५.आ) पुढीलपैकी कोणत्याही २ कृती सोडवा. (शब्द मर्यादा ६० ते ९० शब्द) (१०)**

**जाहिरात लेखन : पुढे दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक स्वरूपात पुनर्लेखन करा.**

हात छोटे काम मोठे

विद्यार्थ्यांच्या कलाकुसरींचे

# भव्य प्रदर्शन

**(सुट्टीतील फुरसतीच्या वेळात छोट्यांनी केलेली अनमोल कामगिरी)**

- कागद–कातर कामातून केलेल्या विविध लक्षवेधक कलाकृती
- शंख–शिंपल्यांतून बनवलेल्या नेत्रदीपक वस्तू
- मातीच्या छोट्या कुंड्यांवरील वारली कलाकृती
- भव्य आणि रंगतदार रंगावली
- अनेक सुंदर चित्रकलाकृती
- अप्रतिम भरतकाम, रंगबीरंगी सुंदर मेणबत्त्या
- लाकडावरील कलात्मक कोरीव काम

**: कालावधी :**

दि. १७ नोव्हेंबर ते दि. १९ नोव्हेंबर

**: वेळ :**

सकाळी ९.०० ते रात्री ८.०० पर्यंत

**: स्थळ :**

लोकमान्य टिळक विद्यालयाचे भव्य पटांगण, लातूर

**२) बातमी लेखन:**

- **पुढील विषयावर बातमी तयार करा.**
  गेटवे ऑफ इंडियावर योगसाधना.

**३) कथा लेखन:**

- **पुढील मुद्यांच्या आधारे कथा लिहा.**
  **मुद्दे :** सैरभैर मनवा ....... आईवडिलांशी वाद ..... अभ्यासाकडे लक्ष नसणे ..... आधुनिक राहणीमानाचे व्यसन ...... वर्गात चोरी करणे ..... घरातून पळून जाणे.... मालिकेत काम मिळण्याचे स्वप्न भंगणे ..... घरी परतणे.

**प्रश्न ५.इ)   पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.   (८)**

**१) प्रसंग लेखन:**


- **'आठवणी स्नेहसंमेलनाच्या'... या विषयावर पुढील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.**

**'आठवणी स्नेहसंमेलनाच्या**

- धम्माल आठवणी
- तबला साथ
- नाटकात भूमिका
- स्नेहसंमेलनाची तयारी
- शिक्षक व विद्यार्थी आनंदात
- स्नेहसंमेलनाचा दिवस

**२) आत्मकथन:**

- **दिलेल्या मुद्यांच्या आधारे 'मोबाईलचे आत्मकथन' लिहा.**




- मोबाईलवर होणारे आरोप
- वाहन चालवताना घ्यायची काळजी
- बातम्यांची सत्यता तपासणे
- मोबाईलची लोकप्रियता
- माहिती मिळवणे व माहिती पाठवण्यासाठी उपयोग
- मोबाईलचा सुयोग्य वापर

**३) वैचारिक लेखन :**

- **पुढील मुद्यांच्या आधारे दिलेल्या विषयावर तुमचे विचार लिहा.**

ग्रामीण जीवनातील स्नेहभाव

अडीअडचणीत मदम करणे

मुलांपासून थोरांपर्यंत एकोपा

ग्रामीण भागातील परस्पर संबंधाचे स्वरूप

ग्रामीण भागातील उणिवा

एकोप्याचा आधार

***********